शासन निर्णय क्र. सांकासं २००५/प्र.क्र.१२६/सां.का.३, दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ चे जोडपत्र
व शासन शुद्धीपत्रक क्र.सांकासं २००५/प्र.क्र.१२६/सां.का.३,दि.२६ डिसेंबर,२००६

## परिशिष्ट अ

## मनोरंजनाचे आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणा-या संस्थांना व संघटनांना सहाय्यक अनुदान मंजूर करण्यासंबंधी नियम

मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणा-या व त्यासाठी मान्यता आणि सहाय्यक अनुदान मिळण्याकरिता शासनाकडे अर्ज करणा-या संस्थांना किंवा संघटनांना पुढील शर्तीच्या अधीन सहाय्यक अनुदान मंजूर करता येईल.

१. जी संस्था किंवा संघटना नाटक, संगीत, नृत्य, तमाशा, नकला, कठपुतळीचे खेळ, लोककला, इत्यादींसारख्या मनोरंजनपर व सांस्कृतिक कार्याची अभिवृध्दी व विकास साधण्याचे कार्य करते अशी संस्था किंवा संघटना सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र समजण्यात येईल.

२. (अ) १) त्या त्यावर्षी उपलब्ध असलेली आर्थिक तरतूद विचारात घेऊन सांस्कृतिक कार्य संचालनालय हे त्या वर्षासाठी प्रत्येक संस्थेला द्यावयाच्या अर्थसहाय्याची रक्कम तसेच संस्थांची संख्या, मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य आणि मा. सचिव, सांस्कृतिक कार्य यांच्या सल्याने निश्चीत करतील. राज्यातील प्रत्येक महसूली विभागाला व मुंबईला शक्यतो समान प्रतिनिधीत्व मिळेल याची दक्षता घेतली जाईल.

तथापि एखाद्या महसूल विभागात पात्र अर्ज पुरेशा संख्येने न आल्यास व अन्य महसूली विभागात पात्र संस्था जास्त असल्यास च्सांस्कृतिक संस्था अर्थसहाय्य समिती  आपल्या अधिकारात समान प्रतिनिधीत्वाची अट शिथील करु शकेल.

२) संबंधीत आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस सांस्कृतिक कार्य संचालनालय हे या योजनेची वृत्तपत्राव्दारे माहिती जाहीर करील आणि इच्छूक सांस्कृतिक संस्थाकडून अर्ज मागवील.

३) आलेल्या अर्जांची सांस्कृतिक कार्य संचालनालय छाननी करील आणि मंजूरीसाठी घ्सांस्कृतिक संस्था अर्थ सहाय्य समितीङ कडे सादर करील. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य हे या समितीचे अध्यक्ष असतील. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य हे उपाध्यक्ष, मा. सचिव, सांस्कृतिक कार्य , उपसचिव, सांस्कृतिक कार्य हे सदस्य तर संचालक, सांस्कृतिक कार्य हे सदस्य सचिव असतील. ही समिती अर्थ सहाय्य मंजूरीबाबत अंतिम निर्णय घेईल.

(ब) सर्वसाधारणपणे हे अनुदान, संस्थेच्या अनुज्ञेय खर्चाच्या ७५ टक्के पेक्षा अधिक होता कामा नये.  मात्र, ही बाब संस्थेचे खर्च वजा जाता होणारे जादा उत्पन्न हे २०,०००/- रुपयांपेक्षा अधिक असणार नाही, ह्या शर्तीस अधिन असेल.

शासन शुध्दीपत्रक क्र. सांकासं २००५/प्र.क्र.१२६/सां.का.३, दि. २६ डिसेंबर २००६ अन्वये हा नियम रद्द करण्यात येत आहे.

(क) खाली नमुद केलेल्या बाबी ह्या अनुदानाकरिता खर्चाच्या अनुज्ञेय बाबी असल्याचे मानण्यात येईल.

नाटकाची निर्मिती व नाटके रंगभूमीवर आणणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, याकरिता नेमलेल्या कलाकारांना द्यावयाचे पारिश्रमीक यावरील खर्च, तसेच वाद्य, पडदे, नेपथ्याची सामुग्री, रंगभूषा, नाटकाचे सामान, रंगमंच प्रकाश योजना, साधनसामुग्री या वस्तु भाड्याने आणण्याकरीता किंवा खरेदी करण्याकरिता येणारा खर्च आणि कार्यालयावरील खर्च म्हणजे कार्यालयाचे भाडे, व्यवस्थापन कर्मचा-यांना द्यावयाचा पगार, मुद्रण व लेखनसामग्री, इत्यादींवरील खर्च.

(ड) खर्च वजा जाता उरलेली जास्तीची रक्कम ही अशी मंजूरी दिलेल्या वर्षापासून तीन वर्षात सांस्कृतिक व मनोरंजनपर कार्यक्रमाची अभिवृध्दी करण्याकरिता वापरण्यात आली पाहिजे. संचालक, सांस्कृतिक कार्य यांना या संबंधात वेळोवेळी माहिती देण्यात आली पाहिजे.

३) (अ) कार्यक्रम समिती, अनुदानाचे प्रमाण व ते चालू ठेवणे याबाबतचा निर्णय घेताना संस्थेने किंवा संघटनेने सादर केलेल्या कार्यक्रमाची संख्या विचारात घेईल.

(ब) ग्रामीण भागात आणि / किंवा औद्योगि क्षेत्रात कार्यक्रम सादर करणा-या संस्थांच्या बाबतीत आस्थापूर्वक विचार करण्यात येईल.

४) ज्या संस्थांना त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुदान मिळत असते त्या संस्थांनी अनुदानाच्या रकमेतून खर्च करुन केलेल्या कार्याचा संपूर्ण अहवाल सादर करुन तो त्या वित्तीय वर्षाच्या अखेरीस सादर केला पाहिजे.

५) सहाय्यक अनुदानाकरिता अर्ज करणा-या संस्थेने किंवा संघटनेने खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत -

अ) संस्था नोंदणी अधिनियम अथवा सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी केलेल्या आणि संस्थेच्या घटनेत 'सांस्कृतिक कार्य ' हा महत्वाचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आलेल्या संस्था,

ब) व्यावसायिक कार्यक्रम न करणा-या अथवा सशुल्क प्रशिक्षण देण्याचा व्यवसाय न करणा-या संस्था,

क) विशेषतः अस्सल आणि पारंपारिक तसेच अभिजात प्रयोगशिल कला (परफॉर्मिंग आर्ट) क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षापासून कार्य करणा-या आणि विविध शासकीय तसेच नामांकित संस्थांनी आयोजित केलेल्या नाट्यस्पर्धा, संगीत स्पर्धा, नृत्य स्पर्धा भरविणा-या किंवा यात भाग घेणा-या किंवा त्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन करणा-या किंवा कार्यक्रमांची निर्मिती करणा-या तसेच हौस म्हणून (अम्यॅच्युअर) कला सादर करणा-या संस्था.

ड) संस्थेचा कारभार चालविण्याकरिता तिची स्वतःची अशी एक रीतसर घटना असली पाहिजे व त्यामध्ये तिची उद्दिष्टे, हेतू, नियम आणि विनियम विनिर्दिष्ट केलेले असले पाहिजेत.

इ) सहाय्यक अनुदानाकरिता अर्ज करण्यापूर्वी किमान तीन वर्ष ती कार्य करीत असली पाहिजे.

ई) मुख्यत्वेकरुन सार्वजनिक हिताच्या उद्देशाने ती चालविण्यात येत असली पाहिजे.

६) अर्थसहाय्य खालील संस्थांना प्राधान्य देण्यात येईल -

अ) मागील तीन वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल/ताळेबंद अहवालाला संवैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालात विपरित आक्षेप नाहीत आणि ज्या सतत किमान तीन वर्ष नफ्यात आहेत अशा संस्था. मागील तीन वर्षाच्या लेखा अहवालाच्या परीक्षणात लेखा परिक्षकांनी आक्षेप घेतलेले नसावेत.

आ) गेल्या तीन वर्षात ज्यांनी विविध नामांकित आणि मान्यताप्राप्त अशा स्पर्धामध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे किंवा कलावंतांनी गौरव प्राप्त केला आहे अशा संस्था.

इ) ज्या उपक्रमासाठी अर्थ सहाय्य मागितले आहे त्या उपक्रमाची नावीन्यता, परिणामकारकता आणि व्यापकता वैशिष्ट्यपूर्ण आहे अशा संस्था.

ई) ज्या संस्थांच्या पदाधिका-यांनी सांस्कृतिक क्षेत्रात राज्य पातळीवर /देश पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा संस्था.

७) वरील मुद्यांच्या आधारे सांस्कृतिक कार्य संचालनालय गुणांकन देऊन अर्जाची छाननी करील व मंजूरीसाठी प्रस्ताव तयार करुन त्यावर्षी जुलै महिन्यामध्ये मा. सचिव, सांस्कृतिक कार्य यांच्यामार्फत मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखालील 'सांस्कृतिक संस्था अर्थसहाय्य समितीकडे ' सादर करील.

८) राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर अर्थसहाय्य मंजूर झालेल्या संस्थांना सांस्कृतिक कार्य संचालनालय अर्थसहाय्य वाटप करील.

९) अर्थसहाय्य मिळालेल्या संस्थेला त्यापुढील दोन वर्ष अनुदान मिळणार नाही. तिस-या वर्षी गुणवत्ते आधारे ती संस्था अर्थसहाय्य मिळण्यास पात्र असेल.

१०) संस्थेच्या किंवा संघटनेच्या दरवर्षीच्या हिशेबाची तपासणी धर्मादाय आयुक्तांनी मान्यता दिलेल्या किंवा संमती दिलेल्या परीक्षकांकडून किंवा सनदीलेखापालाकडून (चार्टड अकाऊंटंट) करण्यात येईल आणि ते हिशेब संचालक, सांस्कृतिक कार्य यांना अखेरच्या वर्षाच्या ३१ डिसेंबरपर्यंत ताळेबंद, प्राप्ती आणि खर्च याची विवरणपत्रे इत्यादींसह सादर करण्यात येतील. संचालक, सांस्कृतिक कार्य हे उचित प्रकरणामध्ये ही आवश्यक बाब सादर करण्याचे धोरण शिथिल करु शकतील व लेखे नंतर सादर करण्यास परवानगी देतील. अनुदान घेणा-या संस्थेच्या हिशेबाची तपासणी महालेखापाल आणि /किंवा संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्याकडून करण्यात येईल.

११) अनुदान घेणारी संस्था दर वर्षी, अनुदानाच्या विनियोगाचा अहवाल, त्यानंतरच्या वित्तिय वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी सादर करावेत.

१२) एखाद्या संस्थेने यात विहीत करण्यात आलेल्या शर्तीचे उल्लंघन केले असल्याबाबत शासनाची खात्री पटली असेल तर अशा अनुदानाची संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग राखून ठेवण्याचा अधिकार शासन राखून ठेवील.

१३) आवश्यक वाटल्यास शासन, अनुदान घेणा-या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळावर आपले प्रतिनिधी म्हणून एक किंवा दोन व्यक्तींना नामनिर्देशित करील. आणि संस्था ही त्यांच्या नामनिर्देशनास मान्यता देईल. हे प्रतिनिधी त्यांचा अहवाल संचालक, सांस्कृतिक कार्य यांना कालावधीने सादर करतील.

१४) सचिव, सांस्कृतिक कार्य यांचा या नियमाशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवरील निर्णय अंतिम असेल आणि तो (संस्थेवर) बंधनकारक असेल.

१५) संचालक, सांस्कृतिक कार्य यांची पूर्वसंमती घेतल्याखेरीज, शासकीय अनुदानातून घेतलेल्या मालमत्तेची, सामुग्रीची विल्हेवाट लावता येणार नाही अथवा तिच्यावर भार निर्माण करता येणार नाही किंवा ज्या प्रयोजनाकरिता त्याचा वापर करता येणार नाही. अनुदान घेणा-या संस्थेने अशा सर्व मालमत्तेचे /सामग्रीचे हिशेब तपासणी केलेले अभिलेख ठेवले पाहिजेत.

१६) दिलेल्या अर्थसहाय्याचा विनियोग त्या-त्या संस्थांनी अर्थ सहाय्य दिल्यानंतर एक महिन्याच्या आत करावयाचा आहे. त्याबाबत त्या संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणार आहे. दिलेल्या कारणांसाठी अर्थसहाय्य खर्च न करणा-या किंवा शासनाच्या या संदर्भातील नियमांचे पालन न करणा-या संस्था त्यापुढील दहा वर्षासाठी अर्थसहाय्याकरिता बाद ठरविण्यात येईल.

१७) अनुदान मिळणा-या संस्थेला वा संघटनेला -

अ) जातीय किंवा धार्मिक विव्देष उफाळून येईल किंवा बळावेल असे कोणतेही कार्य करता येणार नाही. किंवा असा कोणताही कार्यक्रम सादर करता येणार नाही.

आ) शासकीय धोरण किंवा सामाजिक नितिमत्ता यांच्या विरुध्द असलेल्या कोणत्याही गोष्टींचा आपल्या कार्यात किंवा कार्यक्रमात समावेश करता येणार नाही.

इ) विशिष्ट व्यक्तीवर टिका करणारा कार्यक्रम सादर करता येणार नाही. आणि

ई) राजकीय वाद किंवा हिंसाचार उद्भवेल किंवा वाढेल असा कार्यक्रम सादर करता येणार नाही.

## अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.
२) संस्थेची घटना व ज्ञापन.
३) गेल्या तीन वर्षाचा सांस्कृतिक कार्याचा सविस्तर अहवाल त्यामध्ये कार्यक्रमाचा दिनांक, स्थळ, कार्यक्रमाचे स्वरुप, मिळालेला प्रतिसाद इत्यादी बाबी दर्शविण्यात याव्यात. कार्यक्रमासंबंधी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेले वृतांत, परीक्षणे तसेच शक्य असल्यास, निमंत्रण पत्रिका, हॅण्डबील, छायाचित्र, वृत्तपत्रीय जाहिरात कात्रणे इत्यादी बाबीही सादर कराव्यात.
४) मागील तीन वर्षाचे सनदी लेखापालानी प्रमाणित केलेले लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती.
अ) नफा-तोटा पत्रक
ब) जमा व खर्च लेखा
क) ताळेबंद
ड) सांस्कृतिक कार्यावरील सविस्तर खर्चाची प्रमाणित यादी.
इ) सनदी लेखापालांचे लेखा परिक्षणात्मक अहवाल.

५) ज्यासाठी अर्थसहाय्य मागितले आहे - नवीन कार्यक्रम निर्मिती अथवा वाद्य, साधने खरेदी याबाबत तपशिल.

६) याच किंवा अशा अन्य उपक्रमासाठी संस्थेने राज्य शासन किंवा केंद्र शासन किंवा अन्य संस्था यांच्याकडून अर्थ सहाय्य मिळविले असल्यास त्याचा तपशिल वा त्यासाठी अर्ज केला असल्यास त्याचा तपशिल.

* * * * * * * * * * *

# <u>अर्जाचा नमुना</u>

प्रति,
संचालक,
सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन,
१ ला माळा, जुने सचिवालय,
विस्तार भवन, एम. जी. रोड,
मुंबई- ४०० ०३२.

सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणा-या संस्थांना अर्थसहाय्य मिळण्याच्या योजनेअंतर्गत हा अर्ज सादर करीत आहोत. या संबंधीच्या योजनेचे नियम आम्ही वाचले असून या नियमातील अटी व शर्ती आम्हाला पूर्णपणे मान्य आहेत.

१) संस्थेचे नाव व पत्ता :
दूरध्वनी क्र.:

२) अ) संस्थेच्या स्थापनेचे वर्ष :
आ) संस्था नोंदणी अधिनियम / सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी क्रमांक. :
( सोबतच्या यादीनुसार (क्र. १,२ व ३) कागदपत्रे जोडावीत. )

३) संस्थेच्या सांस्कृतिक कार्यासंदर्भात काय ठळक उद्दिष्टे आहेत ? :

४) संस्थेच्या कार्याचे स्वरुप/रुपरेखा. :
(स्वतंत्र माहितीपत्र जोडावे )

५) संस्थेचे कायक्षेत्र :
( शहरी/ग्रामीण/औद्योगिक/आदिवासी.)

६) संस्था नाट्य, नृत्य, संगीत व लोककला यापैकी कोणत्या कलाक्षेत्रात प्रामुख्याने कार्य / कार्यक्रम करीत आहेत ? :

७) संस्थेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत कोणते ? :

८) संस्था व्यावसायिक कार्यक्रम करते का ? :
अथवा शुल्क घेऊन प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा व्यवसाय आहे का ? :

९) संस्था प्रामुख्याने कोणत्या सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करते. :
सोबतच्या यादीनुसार (क्र. ४ अ ४ आ) कागदपत्रे जाडावीत.

१०) मागील आर्थिक वर्षात संस्थेने केलेला खर्च.:

११) मागील तीन वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात :
लेखापरिक्षकाने विपरित आक्षेप घेतले आहेत का?
सोबतच्या यादीनुसार (क्र.५ अ ते ५ई) कागदपत्रे
जोडावीत.

१२) मागील तीन वर्षात संस्थेने नामांकित अथवा मान्यता :
प्राप्त स्पर्धामध्ये मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचा
अथवा संस्थेच्या /कलाकाराच्या झालेल्या गौरवाचा
थोडक्यात तपशिल.
सोबतच्या यादीनुसार (क्र.६)कागदपत्रे जोडावीत.

१३) संस्थेच्या पदाधिका-यांनी सांस्कृतिक क्षेत्रात राज्य :
देशपातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा
थोडक्यात तपशिल.
सोबतच्या यादीनुसार (क्र.६आ)कागदपत्रे जोडावीत.

१४) मागील तीन वर्षात संस्थेला केंद्र शासन अथवा :

१५) संस्थेने ज्या उपक्रमासाठी अनुदान मागितले आहे, :
त्या उपक्रमाचा थोडक्यात तपशिल.
सविस्तर तपशिल (क्र. ८ वर दिलेल्या नमुन्याप्रमाणे)
सोबत जोडण्यात यावा.

१६) संस्थेने मागितलेल्या अनुदानाची रक्कम :

१७) कोणत्या नावाने धनादेश काढणे आवश्यक आहे. :

वरील सर्व माहिती व सोबत प्रमाणित केलेली कागदपत्रे खरी आहेत. वरील माहिती व कागदपत्रे खोटी /चुकीची असल्याचे आढळल्यास संस्थेच्या पदाधिका-यांवर कारवाई याची आम्हाला कल्पना आहे.

अध्यक्ष /सचिव
नाव, पत्ता व स्वाक्षरी.

सोबत जाडावयाची कागदपत्रे.

१) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.
२) संस्थेची घटना तसेच असल्यास माहिती पत्रक
३) संस्थेच्या महत्वाचे पदाधिकारी अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव आदी यांची नावे, पत्ते व दूरध्वनी क्रमांक तसेच त्यांचे व्यवसाय व कला क्षेत्रातील योगदान.
४) अ) मागील तीन वर्षात संस्थेने केलेल्या सांस्कृतिक कार्याचा तपशील
( कार्यक्रमांचा दिनांक, स्थळ, कार्यक्रमाचे स्वरुप, मिळालेला प्रतिसाद
याप्रमाणे रकान्यात द्यावा)

आ) वरील कार्यक्रमाशी संबंधीत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेले वृतांत अथवा परीक्षणे, निमंत्रण पत्रिका, हँडबिल, छायाचित्रांची छायांकित प्रती, जाहीरात कात्रणे इ.

५) अ) सनदीलेखापालांची (सी.ए.) प्रमाणित केलेल्या मागील तीन वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या प्रति.

आ) नफा, तोटा पत्रक

इ) जमा व खर्च लेखे

ई) सांस्कृतिक कार्यावर केलेल्या खर्चाचा बाबवार तपशील.

६) मागील तीन वर्षात संस्थेने सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीच्या गौरवादाखल मिळालेल्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती.

७) मागील तीन वर्षात केंद्रशासन अथवा राज्य शासन अथवा निमशासकीय संस्था यांच्याकडून सांस्कृतिक कार्यासाठी मिळालेल्या निधीचा तपशिल.

( महिना व वर्षा /कोणाकडून मिळाले /निधीची रक्कम /कोणत्या उपक्रमासाठी)

८) ज्या कारणासाठी अनुदान मागितले आहे त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव.

अ) उपक्रमाचे नाव

आ) स्परुप

इ) उपक्रमाचा एकूण खर्च, खर्चाच्या बाबी व त्याप्रमाणे अंदाजित खर्च.

ई) वरील खर्चापैकी संस्थेचा सहभाग

उ) शासनाकडून अपेक्षित अनुदान

* * * * * * * * * * * * * * * *